मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिका स्थायी समिती अध्यक्षपदाचे वेध

## भाजपचे चिंचवड विधानसभा मतदारसंघाला प्राधान्य देण्याचे संकेत

**पिंपरी | प्रतिनीधी**

महापालिका स्थायी समिती सदस्यांची निवड शुक्रवारी (ता. २०) झाली आहे. आता अध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे. संख्याबळानुसार भाजपचाच अध्यक्ष होईल, हे स्पष्ट असले तरी पिंपरी, चिंचवड की भोसरी विधानसभा मतदारसंघातील नगरसदस्याला संधी मिळणार, याची उत्सुकता आहे. विशेषतः सत्तेचा समतोल साधण्यासाठी चिंचवड मतदारसंघाकडे अध्यक्षपद जाणार, असल्याचे संकेत आहेत.

'महापालिका तिजोरीच्या चाव्या' अशी स्थायी समितीची ओळख आहे. तिच्या १६ सदस्यांसह विविध विषय समित्यांसाठी प्रत्येकी नऊ सदस्यांची निवड शुक्रवारच्या सर्वसाधारण सभेत झाली. आता स्थायीसह प्रत्येक विषय समिती अध्यक्षांची निवड त्या-त्या समिती सभेत होईल. संख्याबळानुसार सर्वच समित्यांवर भाजपच्याच नगरसदस्यांची वर्णी लागणार हे निश्चित आहे. कारण, स्थायीच्या १६ सदस्यांमध्ये भाजपचे ११, राष्ट्रवादीचे चार आणि शिवसेनेचा एक असे संख्याबळ आहे.

सर्वच विषय समित्यांमध्ये भाजपचे प्रत्येकी सहा आणि राष्ट्रवादीचे प्रत्येकी तीन सदस्य आहेत. महापालिका सभागृहातील पुरेशा संख्याबळाअभावी विषय समित्यांमध्ये शिवसेनेला प्रतिनिधित्व मिळालेले नाही. यामध्ये विधी, महिला व बालकल्याण, शहर सुधारणा,



शिक्षण आणि क्रीडा- कला-साहित्य व सांस्कृतिक या समित्यांचा समावेश आहे.

**अध्यक्षपदाचे सूत्र**

स्थायी समितीच्या ११ सदस्यांमधील चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या शालिनी गुजर व मनीषा चिंचवडे पहिल्यांदा निवडून आल्या आहेत. अभिषेक बारणे, संदीप कस्पटे व बाबासाहेब त्रिभुवन दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. यातील अभिषेक बारणे व संदीप कस्पटे यांची नावे स्थायीच्या अध्यक्षपदासाठी चर्चेत आहेत. त्यांत कोणाला संधी मिळते याकडे लक्ष आहे.

### भाजपचे सदस्य

» स्थायी समिती सदस्यपदासाठी भाजपने चिंचवड विधानसभा मतदारसंघातील अभिषेक बारणे, शालिनी गुजर, मनीषा चिंचवडे, संदीप कस्पटे, बाबासाहेब त्रिभुवन भोसरी विधानसभा मतदारसंघातील सारिका गायकवाड, योगिता नागरगोजे, कृष्णा सुरकुले, शीतल वर्णेकर, अर्चना करांडे व मधुरा शिंदे यांना संधी दिली आहे.

### 'चिंचवड'ला संधी

» स्थायी समितीत भाजपच्या ११ सदस्यांमध्ये सात महिला व चार पुरुष सदस्य आहेत. भाजपने महापौरपद भोसरी विधानसभा मतदारसंघातील तर उपमहापौरपद पिंपरी मतदारसंघातील सदस्याला दिले आहे. त्यामुळे सर्वार्थाने महत्त्वाची मानल्या जाणाऱ्या स्थायी समिती अध्यक्षपद चिंचवड विधानसभा मतदारसंघातील सदस्याला देण्याची चर्चा असून, केवळ घोषणा बाकी असल्याचे कळते.

---

# शासकीय भूखंडाचा श्रीखंड; पीएमआरडीएचा मनमानी कारभार उघड

## ज्ञानेश्वर कस्पटे यांचे आमरण उपोषण; परतावा भूखंडांवर दलालांचा डल्ला

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाकड येथील स्थानिक भूमिपुत्रांचे हक्क डावलून परतावा भूखंडांचे बेकायदेशीर वाटप केल्याचा गंभीर आरोप करत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात आले आहे. प्रशासनाच्या कथित मनमानी कारभाराच्या निषेधार्थ ज्ञानेश्वर संपत कस्पटे आणि समीर बबन कस्पटे यांनी आमरण उपोषण सुरू केले असून, "जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत माघार नाही," असा इशारा दिला आहे.

वाकड परिसरात वातावरण तापले असून, ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र रोष निर्माण झाला आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या मते, शासनाच्या १५ सप्टेंबर १९९३ च्या निर्णयानुसार संपादित जमिनीच्या बदल्यात संबंधित भूमिपुत्रांना त्याच गावात उपलब्धतेनुसार १२.५ टक्के परतावा भूखंड देणे बंधनकारक आहे. मात्र, प्रत्यक्षात वाकडमधील पात्र शेतकऱ्यांना डावलून बाहेरील धनदांडग्या व्यापाऱ्यांना आणि काही मर्जीतील व्यक्तींना भूखंडांचे वाटप करण्यात येत असल्याचा थेट आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे. संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी उपोषणकर्ते कस्पटे यांनी केली आहे.

या उपोषणाला ग्रामस्थांनी ठाम पाठिंबा दर्शविला असून या उपोषण आंदोलनात मारुती कस्पटे, मुकेश कस्पटे, सोमनाथ कस्पटे, सुहास कस्पटे, सचिन कस्पटे, संजय कस्पटे,



तानाजी शेडगे, बाळासाहेब कस्पटे यांच्यासह असंख्य ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शवला आहे. उपोषणस्थळी दररोज ग्रामस्थांची उपस्थिती वाढत असून, हा लढा आता व्यापक जनआंदोलनात रूपांतरित होताना दिसत आहे.

**प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

स्थानिक शेतकऱ्यांना आपल्या हक्कासाठी उपोषणासारखे टोकाचे पाऊल उचलावे लागत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शासन निर्णय स्पष्ट असतानाही त्याची अंमलबजावणी न झाल्यास जबाबदार कोण, असा सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. "आमच्या हक्काच्या जमिनी मिळेपर्यंत आणि संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होईपर्यंत उपोषण सुरूच राहील," असा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

वाकडमधील हा संघर्ष आता केवळ काही कुटुंबांपुरता मर्यादित न राहता भूमिपुत्रांच्या अस्तित्वाचा आणि हक्कांचा प्रश्न बनला आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली नाही, तर हे आंदोलन आणखी तीव्र होणार असल्याचे कस्पटे यांनी सांगितले.

### शासन निर्णयाला हरताळ?

» आंदोलनकर्त्यांचा दावा आहे की, अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयीन खटले प्रलंबित असतानाही तसेच काही शेतकऱ्यांना अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नसतानाही परतावा भूखंडांची प्रक्रिया घाईघाईने राबवण्यात आली. नियमांची पायमल्ली करून विशिष्ट लोकांना फायदा पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. ज्ञानेश्वर कस्पटे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, "भूमिपुत्रांच्या हक्कांवर घाला घालून दलाल आणि व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठी प्रशासन काम करत असेल, तर तो लोकशाहीचा अपमान आहे."

### रेडी रेकनर दरातील तफावत

» विशेष म्हणजे, भोसरी, मोशी आणि बोऱ्हाडेवाडी परिसरात पीएमआरडीएकडे भूखंड शिल्लक असतानाही काही विशिष्ट व्यक्तींना वाकडसारख्या मोक्याच्या आणि उच्च बाजारमूल्य असलेल्या ठिकाणी भूखंड देण्यात आल्याचा आरोप आहे. वाकड आणि भोसरी येथील रेडी रेकनर दरांमध्ये मोठी तफावत असतानाही हा व्यवहार करण्यात आल्याने आर्थिक गैरव्यवहार आणि संगनमताचा संशय व्यक्त केला जात आहे.

# अवैध गुटखा विक्रीबाबत आमदार शंकर जगताप यांनी केली विधानसभेत 'पोलखोल'!

## आमदार जगताप यांच्या विधानसभेतील तारांकित प्रश्नानंतर धक्कादायक माहिती उघड

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यात गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूवर कडक कायदेशीर बंदी असतानाही छुप्या मार्गाने विक्री आणि उत्पादन जोरात सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव आमदार शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नामुळे समोर आले आहे. गेल्या पाच वर्षांत पोलीस प्रशासनाने १३ हजार ७८३ गुन्हे दाखल करत तब्बल १८ हजार ५०१ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. एकट्या २०२५ या वर्षात तब्बल २३९ कोटी १० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आमदार जगताप यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यामुळे नाशिक, ठाणे आणि अहिल्यानगरमधील कोट्यवधींच्या गुटखा तस्करीचे धागेदोरे समोर आले आहेत. दरम्यान नाशिक आणि ठाणे जिल्ह्यात मोठ्या कारवाया करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राज्यात २० जुलै २०१२ पासून दरवर्षी गुटखाबंदीचे आदेश नूतनीकरण केले जातात. सध्याच्या अधिसूचनेनुसार, राज्यात गुटखा उत्पादन, साठा, वितरण आणि वाहतुकीवर पूर्णतः बंदी आहे. मात्र तरीही मुंबई ,ठाणे, पालघर, छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात अवैधरीत्या गुटख्याचे उत्पादन व विक्री सुरु असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले. दरम्यान याचे लोन अनेक शहरांमध्ये देखील पसरत आहे. याचा धागा जोडत आमदार जगताप यांनी तारांकित प्रश्नांच्या (क्रमांक २३१२७) माध्यमातून गुटखाबंदीचा ढिसाळपणा शासनाच्या निदर्शनास आणून दिला. गुटखाबंदी संदर्भात



राज्य शासनाकडून कोणती उपाययोजना केली जात आहे. याची विचारणा देखील त्यांनी केली. यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या पाच वर्षांतील पोलीस कारवाईची सांख्यिकी सादर केली. अन्न सुरक्षा व मानके कायद्या'नुसार दोषींवर

### पाच वर्षांतील कारवाईचा 'ग्राफ'

» वर्ष, दाखल गुन्हे, उघड गुन्हे, अटक आरोपी
२०२१, "२,६९७", "२,६९४", "३,९३४"
२०२२," २,३८७", "२,३७८", "३,३३२"
२०२३, "३,४७७", "३,४६९", "४,३९४"
२०२४," २,७८४", "२,७७७", "३,६६८"
२०२५ ,"२,४३८", "२,४१४", "३,१७३"
एकूण, "१३,७८०", "१३,७३२", "१८,५०१"

> राज्यातील तरुण पिढीला व्यसनाधीनतेच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी गुटखाबंदीची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. यासाठी मुख्यमंत्री तसेच संबंधित विभागांच्या माध्यमातून केले जाणारे प्रयत्न दिलासादायक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिलेल्या उत्तरातून स्पष्ट होत आहे . मात्र केवळ कागदोपत्री आकडेवारी न दाखवता, प्रत्यक्ष गुटखा विक्री शून्यावर आणण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलली पाहिजेत, यासाठी माझा पाठपुरावा सुरूच राहील.
>
> - शंकर जगताप, आमदार, पिंपरी चिंचवड

कारवाई सुरू आहे यात सातत्य राखले जाईल असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला शहराध्यक्षा प्रा. कविता अल्हाट यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले समाजभूषण पुरस्कार प्रदान

**पिंपरी | प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले मंडळ, चिंचवड यांच्या वतीने दिला जाणारा अत्यंत मानाचा “क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले समाज भूषण पुरस्कार” राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांना प्रदान करण्यात आला. चिंचवड येथे आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे, ओबीसी कल्याण मंत्री ना. अतुल सावे आणि संसदरत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या शुभहस्ते आल्हाट यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रा.कविता आल्हाट यांनी आजवर शिक्षण, सामाजिक जनजागृती आणि स्त्री सक्षमीकरणाच्या क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य, तसेच समाजातील उपेक्षित घटकांसाठी दिलेला लढा याची दखल घेऊन महात्मा फुले मंडळाने त्यांना या गौरवासाठी निवडले.

हा सन्मान स्वीकारल्यानंतर आपली भावना व्यक्त करताना प्रा. कविता आल्हाट म्हणाल्या की, हा पुरस्कार केवळ वैयक्तिक सन्मान नसून माझ्या आजवरच्या संघर्षाचा, कष्टाचा आणि समाजसेवेच्या प्रामाणिक प्रयत्नांचा गौरव आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांनी प्रेरित होऊनच मी सार्वजनिक जीवनात काम करत असून, या पुरस्कारामुळे समाजसेवेची जबाबदारी अधिक वाढली असल्याची जाणीव त्यांनी करून दिली.

या कार्यामध्ये कुटुंब, सहकारी आणि पाठीशी उभे राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा मोलाचा वाटा असल्याचे सांगत त्यांनी सर्वांचे आभार मानले. अनेक संकटे आणि अडचणींवर मात करत समाजासाठी




काहीतरी चांगले करण्याची जिद्द या पुरस्कारामुळे अधिक प्रबळ झाली असून, भविष्यात अधिक जोमाने कार्य करण्याची ऊर्जा मिळाली असल्याचेही त्यांनी नमूद केले. या सोहळ्याप्रसंगी महात्मा फुले मंडळाचे अध्यक्ष हनुमंत माळी व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

आल्हाट यांच्या या यशाबद्दल राजकीय आणि सामाजिक स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सांगवीत भरणार भव्य ‘पवनाथडी’ जत्रा!

## 25 फेब्रुवारी ते 1 मार्चदरम्यान महिला बचत गटांना विक्रीचे व्यासपीठ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या वतीने महिला बचत गटांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ‘पवनाथडी’ जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम २५ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या जत्रेचे उद्घाटन २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.




महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर आयोजित या उपक्रमात नागरिकांना खरेदीसोबतच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी अनुभवता येणार आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांचे तसेच विविध उपयुक्त वस्तूंचे स्वतंत्र स्टॉल्स येथे उभारण्यात आले असून, या माध्यमातून महिला उद्योजकतेला चालना मिळणार आहे. यासोबतच स्थानिक उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. या उपक्रमात महिला बचत गटांनी निर्मित केलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ आणि पारंपरिक हस्तकलेचे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे. शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

याशिवाय खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, शंकर जगताप, शंकर मांडेकर, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्यासह महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर तसेच नगरसदस्य,नगरसदस्या आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे , शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार आहेत.

### पवनाथडी जत्रेत होणारे सांस्कृतिक कार्यक्रम

- (सर्व कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता सुरु होणार आहेत.)
- २५ फेब्रुवारी – ‘महाराष्ट्राची मराठी बाणा’
- २६ फेब्रुवारी – सुप्रसिद्ध होम मिनिस्टर कार्यक्रम
- २७ फेब्रुवारी – ऑर्केस्ट्रा म्युझिकल स्टार्स,
- २८ फेब्रुवारी – ‘फोक संस्कृती’
- १ मार्च – द फोक लावणी’

# बनावट भरती प्रक्रियेपासून सावधान.. महापालिकेचे आवाहन




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सध्या कोणत्याही पदासाठी भरती प्रक्रिया सुरू नसल्याची स्पष्ट माहिती प्रशासन विभागाने दिली आहे. अलीकडे समाजमाध्यमांवर महानगरपालिकेत विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू असल्याचे भासवणारी खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केली जात आहे. तसेच महापालिकेच्या नावाने बनावट नियुक्तीपत्रे, उमेदवारांची यादी देखील प्रसिद्ध केली जात आहे. परंतु महानगरपालिकेकडून भरती प्रक्रियेबाबत अद्याप कोणतेही अधिकृत आदेश अथवा सूचना जारी करण्यात आलेल्या नाहीत, अशी माहिती प्रशासन विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

तथापि, बनावट जाहिराती व संदेशांच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न होत असल्याच्या तक्रारी प्रशासन विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशा अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महापालिकेच्या प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

भरती प्रक्रियेबाबतची सर्व अधिकृत माहिती वेळोवेळी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे इतर कोणत्याही माध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या माहितीवर विश्वास न ठेवता नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊनच तिची खातरजमा करावी, असे आवाहन प्रशासन विभागाचे सहआयुक्त मनोज लोणकर यांनी केले आहे.

# मोरवाडी चौकात ‘ग्रेट सेपरेटर’मध्ये कंटेनर अडकल्याने मोठी वाहतूक कोंडी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील मोरवाडी चौक परिसरात मंगळवारी (दि.२४) सकाळी ‘ग्रेट सेपरेटर’मध्ये एक कंटेनर अडकल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. सकाळच्या गर्दीच्या वेळी ही घटना घडल्याने नोकरदार, विद्यार्थी आणि व्यावसायिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.




मिळालेल्या माहितीनुसार, उंची मर्यादेपेक्षा जास्त असलेला कंटेनर ग्रेड सेपरेटरखाली जात असताना अडकला. त्यामुळे मोरवाडी चौकातून नाशिक फाटा तसेच चिंचवड गावकडे जाणारी वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली. काही मिनिटांतच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि परिसरात वाहतूक कोंडीची स्थिती निर्माण झाली.

घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. क्रेनच्या सहाय्याने अडकलेला कंटेनर बाजूला काढण्याचे काम हाती घेण्यात आले. दरम्यान, पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्यात आली; मात्र कोंडी पूर्णपणे सुटण्यास सुमारे एक ते दीड तास लागल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

या घटनेमुळे ‘ग्रेट सेपरेटर’खालील उंची मर्यादा आणि अवजड वाहनांच्या वाहतुकीबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. संबंधित विभागाने उंचीबाबत स्पष्ट सूचना फलक लावावेत तसेच सकाळ-सायंकाळच्या गर्दीच्या वेळी अवजड वाहनांवर निर्बंध आणावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, या प्रकारामुळे शहरातील वाहतूक नियोजनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# पुणे पोलिसांचा 'PTP' अ‍ॅप उपक्रम

## 1.81 लाख तक्रारी, विजेत्यांचा सन्मान; 3.83 कोटींचा दंड वसूल

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहर पोलिस आयुक्तालय येथे सोमवारी जानेवारी महिन्यातील 'पीटीपी' अ‍ॅप कारवाईतील विजेत्यांचा पुरस्कार वितरण समारंभ उत्साहात पार पडला. पुणे शहर वाहतूक शाखा मार्फत आयोजित या कार्यक्रमात 'पीटीपी' अ‍ॅपद्वारे सर्वाधिक वाहतूक नियमभंग नोंदविणाऱ्या नागरिकांचा गौरव करण्यात आला.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात तक्रार नोंदविण्यासाठी जानेवारी महिन्यात 'पीटीपी' अ‍ॅप नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले. या उपक्रमांतर्गत पीपीसीआर व वाहतूक शाखेच्या संयुक्त विद्यमाने सर्वाधिक कारवाई करणाऱ्या पहिल्या पाच विजेत्यांसाठी बक्षीस योजना जाहीर करण्यात आली होती.

प्रथम पारितोषिक 50 हजार रुपये व प्रमाणपत्र, द्वितीय 25 हजार, तृतीय 15 हजार, चतुर्थ 10 हजार आणि पंचम 5 हजार रुपये अशी बक्षिसे निश्चित करण्यात आली. जानेवारी महिन्यातील विजेते फेरीत घोषित करण्यात आले होते. त्यांना अमितेश कुमार, पोलिस आयुक्त, पुणे शहर यांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. 'पीटीपी' अ‍ॅपद्वारे प्रभावी कारवाई नोंदविणाऱ्या तीन अंमलदारांनाही प्रशस्तीपत्र देण्यात आले.

**रोख पारितोषिके देऊन केले कौतुक**

पीटीपी अ‍ॅपद्वारे बाणेर येथील चैतन्य तल्लम यांनी 314 फोटो पीटीपी अ‍ॅपवर अपलोड केले. त्यापैकी 268 फोटो ग्राह्य धरून त्यावर आधारित वाहतूक नियमभंग करणाऱ्याविरुद्ध दंडात्मक चलन पाठविण्यात आले. त्यांनी सर्वाधिक वाहतूक नियमभंगाचे फोटो अपलोड केल्याने त्यांना पहिल्या क्रमांकाने गौरविण्यात आले. त्यांना 50 हजार रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले. दुसरा क्रमांक शशांक एम यांना देण्यात आला. त्यांना 25 हजारांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. त्यांनी 236 फोटो अपलोड केले. त्यापैकी 218 चलन दंडात्मक चलन नागरिकांना पाठविण्यात आले. तिसरा क्रमांक संदीप साठे 238 चलन तर 217 चलनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या वेळी त्यांना 15 हजारांचे पारितोषिक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. रंजितसिंग रघुवंशी यांना चौथ्या क्रमांकाचे 10 हजाराचे तर पाचव्या क्रमांकाचे 5 हजाराचे पारितोषिक ज्ञानेश सायखेडेकर यांना प्रदान करण्यात आले.

### 'पीटीपी'द्वारे 1 लाख 81 हजार 555 तक्रारी

» आतापर्यंत 93 हजार 190 नागरिकांनी अ‍ॅपचा वापर केला असून, 1 लाख 81 हजार 555 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी 1 लाख 32 हजार 485 प्रकरणांची पडताळणी करून कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये 3 कोटी 83 लाख 37 हजार 900 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. कार्यक्रमास सह पोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलिस उपआयुक्त (वाहतूक) हिम्मत जाधव यांनी विजेत्यांचे अभिनंदन करून नागरिकांनी 'पीटीपी' अ‍ॅपचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन केले.

# फटाक्यासारख्या आवाज करणाऱ्या सायलेंन्सरवर बुलडोझर

## खराडी पोलिसांनी कारवाई करून 45 बुलेट चालकांना पकडले

**पुणे | प्रतिनिधी**

फटाक्यासारखा आवाज निर्माण करणारे सायलेंन्सर बसवून ध्वनीप्रदुषण करणे, तसेच नागरिकांना त्रास होईल असे कृत्य करणाऱ्या बुलेट चालकांविरुद्ध पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. खराडी पोलिसांनी कारवाई करून ४५ बुलेट चालकांना पकडले. बुलेटला बसविण्यात आलेले सायलेन्सर जप्त करुन त्याच्यावर बुलडोझर चालविला.

खराडी भागात बुलेट चालक तरुण भरधाव वेगाने जात असून, त्यांच्या बुलेटच्या सायलेंन्सरमधून फटाक्यासारखे आवाज निर्माण होत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे करण्यात आल्या होत्या. कर्णकर्कश आवाजामुळे नागरिकांना विशेषत : ज्येष्ठांना त्रास होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्यानंतर खराडी पोलिसांच्या पथकाने ४५ बुलेट चालकांना पकडले. त्यांच्या बुलेटला बसविण्यात आलेले सायलेंन्सर जप्त करण्यात आले. फटाक्यासारखे आवाज करणारे सायलेंन्सर जप्त करण्यात आला. अशा सायलेंन्सरवर बुलडोझर चालविण्यात आला.

अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली खराडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, उपनिरीक्षक राहुल कोळपे, पोलीस कर्मचारी महेश नाणेकर, नवनाथ वाळके, सचिन पाटील, साहेबराव गुंडाळे, संतोष लवटे, विलास केदारी, अशोक केदार, श्रीकांत कोंद्रे, सुरज जाधव यांनी ही कारवाई केली.

यापूर्वी शहराच्या वेगवेगळ्या भागात पोलिसांनी फटाक्यांसारखा आवाज करणारे सायलेंन्सर बसवून नागरिकांना त्रास देणाऱ्या बुलेट चालकाविरुद्ध कारवाई केली होती. सायलेंन्सरमध्ये फेरफार करणे, तसेच विक्री करणाऱ्या गॅरेज चालकांसह दुकानदारांविरुद्ध कारवाई केली होती.




### पोलिसांकडे तक्रार करण्याचे आवाहन

» फटाक्यासारखे आवाज निर्माण करणाऱ्या सायलेंन्सर बसविणाऱ्या बुलेट चालकांविरुद्ध यापुढील काळात कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांना अशा प्रकारचे आवाज करणारे बुलेट चालक आढळून आल्यास त्वरीत पोलिसांकडे तक्रार करावी, असे आवाहन खराडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांनी केले आहे.